POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

गणपती बाप्पा मोरया

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-३४ ● मुंबई, शुक्रवार,०५ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## कारवाई थांबवा !

# अवैध कामावर छापा टाकणाऱ्या महिला अधिकाऱ्याला उपमुख्यमंत्री पवारांचा दम, नेमकं काय घडलं?

**■सोलापूर । प्रतिनिधी,**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या थेट आणि धडाडीच्या कामकाजासाठी ओळखले जातात. प्रशासनात त्यांचा दबदबा असल्याचे सर्वत्र मानले जाते. मात्र, बुधवारी घडलेल्या एका प्रकारामुळे ते पुन्हा चर्चेत आले आहेत. करमाळा विभागातील पोलिस उपअधीक्षक अंजली कृष्णा यांच्याशी अजित पवारांचा झालेला फोनवरील संवादाचे रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाले. आरोप असा आहे की, या संभाषणादरम्यान अंजली कृष्णा यांनी सुरुवातीला अजित पवारांना ओळखले नाही. यामुळे संतापलेल्या पवारांनी त्यांना फोनवर खडेबोल सुनावलेच, पण थेट व्हिडिओ कॉल करून दमदाटी केली. अचानक आलेल्या या कॉलमुळे अंजली कृष्णा गोंधळून गेल्या आणि त्या घाबरत बांधावरच बसल्या, असे सांगितले जाते. हा प्रकार सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुर्डू गावात घडला, जिथे अंजली कृष्णा कारवाईसाठी पोहोचल्या होत्या. दरम्यान, हे कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने




**अजित पवारांना ओळखलं नाही...**

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुर्डू गावात रस्त्याच्या कामासाठी सुरू असलेल्या मुरूम उत्खननाच्या तक्रारीनंतर पोलिस उपअधीक्षक अंजली कृष्णा घटनास्थळी दाखल झाल्या. या कारवाईदरम्यान त्यांची ग्रामस्थांशी शाब्दिक वादावादी झाली. त्याच वेळी काँग्रेसचे आमदार बाबा जगताप यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना थेट फोन लावून तो अंजली कृष्णा यांच्याकडे दिला. फोनवर पवारांनी स्वतःची ओळख करून देत कारवाई तत्काळ थांबविण्याचे आदेश दिले. मात्र, अंजली कृष्णा यांनी त्यांचा आवाज ओळखला नाही. यामुळे नाराज झालेल्या पवारांनी कठोर शब्दांत म्हणाले – 'मैं डीसीएम अजित पवार बोल रहा हूं, कारवाई बंद करो, मेरा आदेश है.'

वाद पेटला आहे. शेतकरी संघटनेनं आरोप केला आहे की, अजित पवारांनी बेकायदेशीर कामांना पाठबळ देत महिला अधिकाऱ्याचा अपमान केला आहे.

करमाळ्याच्या पोलिस उपअधिक्षक अंजली कृष्णा यांना उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोनवरुन ओळखता आले नाही. त्यानंतर रागावलेल्या अजित पवारांनी अंजली कृष्णा यांना खडेबोल सुनावत थेट व्हिडीओ कॉलच केला.

अंजली कृष्णा यांनी पवारांना थेट उत्तर देत, 'मेरे फोन पर कॉल करो' असे सांगितल्यावर अजित पवार अधिकच संतापले. त्यांनी कठोर शब्दांत इशारा देत म्हटले - 'तुम पे ॲक्शन लुंगा, इतनी डेरिंग है तुम्हारी? मेरा चेहरा तो पहचानोगी ना?' यानंतर पवारांनी वेळ न दवडता व्हिडिओ कॉल सुरू केला. हा कॉल लागताच अंजली कृष्णा थेट बांधावर बसलेल्या अवस्थेत पवारांशी संवाद साधताना दिसल्या. या संभाषणादरम्यान पवारांनी स्पष्टपणे कारवाई तात्काळ थांबविण्याचे निर्देश दिले. इतकेच नव्हे, तर 'माझा फोन आलाय, हे तहसीलदारांना सांगा,' असे सांगून त्यांनी अधिकाऱ्यांनाही आपला आदेश कळविण्याचे निर्देश दिल्याचे ऐकू आले. दरम्यान, उपस्थित ग्रामस्थांनी सुरु असलेले मुरूम उत्खनन हे ग्रामपंचायतीच्या परवानगीने होत असल्याचा दावा केला. मात्र, त्यांनी आपल्या म्हणण्याचा कोणताही ठोस पुरावा किंवा कागदपत्रं दाखवली नाहीत. त्यामुळे परवानगी वैध असल्याचे सिद्ध न झाल्याने पोलिस उपअधीक्षक अंजली कृष्णा, या महिला आयपीएस अधिकाऱ्यांनी उत्खननाविरुद्धची कारवाई सुरूच ठेवली.

# मिरा- भाईंदरमध्ये सात दिवसांपर्यंत १७ हजार ३०० गणेश मूर्तींचे विसर्जन



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आदेश देत सहा फुटापर्यंतच्या पीओपी मूर्त्यांना नैसर्गिक तलाव, खाडी आणि समुद्रात विसर्जन करण्यास बंदी केली होती. त्यानुसार आजपर्यंत सात दिवसांच्या गणेश मूर्ती आणि गौरी अशा १७, ३०० मूर्त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला आहे. तर महत्वाचे म्हणजे मिरा- भाईंदर महापालिकेच्या बंदोबस्तामुळे नैसर्गिक तलाव आणि खाडी समुद्रात विसर्जन करण्यास मज्जाव करण्यात आला. मिरा- भाईंदर महानगरपालिकेने शहरात गणेशोत्सवापूर्वी पोलीस, वाहतूक विभाग यांच्याशी आणि महापालिका अंतर्गत बैठका घेत शहरात ३५ हून अधिक कृत्रिम तलाव स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार विविध ठिकाणी कृत्रिम तलाव उभारत भाईंदर पश्चिमेच्या राई गावचे एकमेव उदाहरण वगळता एकही मूर्ती नैसर्गिक तलावात विसर्जित करू दिलेली नाही. त्याकरिता पालिका व पोलिसांचा चोख बंदोबस्तात सात दिवसांच्या १७,३०० गणेश मुर्ती व गौरी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. त्यात घरगुती शाडूच्या २,६८१, पीओपी १३,८७६, सार्वजनिक ५६० छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन, सहा फुटांवरील ५२ मूर्तींचे विसर्जन आणि १३१ गौरी मूर्ती असे एकूण १७, ३०० गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. यासाठी पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांनी नियोजन केले. याआधी दीड दिवसाचे ६३८४, तीन दिवसांचे ११६७, पाच दिवसांचे ४२९२ आणि २७२४ अशा एकूण पीओपी १४, ५६७ , २६८१ आणि सहा फुटांवरील ५२ अशा मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. पालिका आयुक्तांनी शहरातील कृत्रिम तलाव तसेच मूर्ती संकलन केंद्रांना भेट देऊन तेथील स्वच्छता, व्यवस्थापन आणि सुविधांची पाहणी केली. विसर्जन प्रक्रियेनंतर कृत्रिम तलाव पुन्हा स्वच्छ पाण्याने भरावेत तसेच मूर्ती संकलन केंद्रांची संख्या वाढवून नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा द्याव्यात, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या. आगामी अनंत चतुर्दशी दिवशी गणेश विसर्जन पार पाडताना नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व विभागांनी सज्ज राहण्याचे निर्देश देखील आयुक्तांनी दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, प्रियंका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण, सहाय्यक आयुक्त, पोलीस निरीक्षक आणि महापालिका कर्मचारी हे उपस्थित होते.

**खोल कृत्रिम तलाव उभारण्याची मागणी**

तर कृत्रिम तलावात तीन फुटापर्यंत पाणी असताना त्यात सहा फुटापर्यंतच्या मोठ्या गणेश मूर्ती कशा विसर्जित करायचा हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनी पालिकेला विचारला आहे. त्यामुळे येर्णाया अनंत चतुर्दशी दिवशी मोठ मोठे कृत्रिम तलाव बनवून त्यात सात ते आठ फुटापर्यंत पाणी भरुन मूर्ती विसर्जित करण्याची व्यवस्था करावी. यामुळे मोठ्या गणेश मूर्ती या पाण्यात बुडतील, त्यात त्यांचे विसर्जन करण्याची व्यवस्था करावी अशी मागणी केली आहे.

# मुंबईत कबड्डीपटूने केली आत्महत्या



**■मुंबई । प्रतिनिधी,**

वांद्रे परिसरात आई आणि भावासोबत राहणाऱ्या २० वर्षीय कबड्डीपटूने टोकाचे पाऊल उचलले. गंभीर आजारी असलेल्या या कबड्डीपटूने आत्महत्या केली. त्याने आत्महत्या करताना चिठ्ठी किंवा कोणताही संदेश मागे ठेवला नव्हता. त्यामुळे पोलिसांनी त्याच्या बाबत सखोल चौकशी केली आणि नैराश्यातून कबड्डीपटूने टोकाचे पाऊल उचलल्याची शक्यता व्यक्त केली. वांद्रे पोलीस या प्रकरणात अद्याप तपास करत आहेत.

हाती आलेल्या माहितीनुसार कबड्डीपटू मोहम्मद आसिफ खान आई आणि भावासोबत वांद्रे परिसरात राहत होता. बुधवार ३ सप्टेंबर रोजी मोहम्मदची आई कामानिमित्त घराबाहेर होती. मोहम्मदचा भाऊ कॉलेजला गेला होता. घरात कोणीही नव्हते. त्यावेळी मोहम्मद आसिफ खानने गळफास घेऊन जीवन संपवले. शेजाऱ्यांना जेव्हा मोहम्मदने आत्महत्या केल्याचे लक्षात आले त्यावेळी त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घरात प्रवेश केला आणि मोहम्मदला तातडीने भाभा रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी करुन मोहम्मदचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

# महाराष्ट्राला 7 हजार कोटींचा फटका, जीएसटी स्लॅबमुळे आर्थिक खड्डा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली घोषणा आणि त्यानुसार जीएसटी परिषदेने उमटवलेली मोहोर यामुळे महाराष्ट्राला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. दोन दिवसीय परिषदेत जीएसटीचे चारऐवजी दोन स्लॅब करण्यात आले. सध्याचे 5 टक्के, 12, 18 आणि 28 टक्के असे चार स्लॅब आहेत. त्याऐवजी यापुढे 5 टक्के आणि 18 टक्के असे दोन स्लॅब असतील. या कराच्या नव्या स्लॅबमुळे महाराष्ट्राला पुढील सहा महिन्यांत अंदाजे 6 ते 7 हजार कोटींचा फटका बसू शकेल, असा अंदाज आहे. महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण सारख्या लोकानुयायी योजना राबवून तिजोरीवर आर्थिक ताण टाकला. आता राज्याच्या तिजोरीला वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) स्तर बदलामुळे जवळपास 7 हजार कोटी रुपयांचा फटका बसण्याचा अंदाज आहे. अशातच महाराष्ट्र सरकारने अन्य राज्यांप्रमाणे केंद्राकडे नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. यामुळे 2025-26 या आर्थिक वषार्तील अपेक्षित महसुलाचे उद्दिष्ट गाठणे वित्त विभागासाठी जास्त आव्हानात्मक बनले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरुन भारतीयांना संबोधिताना जीएसटीमध्ये अमुलाग्र बदल करण्याचे आणि दिवाळीपूर्वी स्वस्ताई होईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार झालेली जीएसटी मंत्रिगटाची बैठक आणि आता नवी दिल्लीत झालेली दोन दिवसीय जीएसटी परिषदेत जीएसटीमधील अमुलाग्र बदलावर शिक्कामोर्तब




करण्यात आले. यापुढे कराचे चारऐवजी दोन स्लॅब असतील आणि याची अंमलबजावणी 22 सप्टेंबरपासून केली जाईल, असे जाहीर करण्यात आले आहे. जीएसटीमधील रचना बदलामुळे येत्या 6 महिन्यांत राज्याला 6 ते 7 हजार कोटींच्या महसुलाला मुकावे लागेल, अशी माहिती वित्त विभागाच्या एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली. राज्य सरकारने 2025-26 या आर्थिक वर्षात राज्य जीएसटी, आंतरराज्य जीएसटी, जीएसटी, मूल्यवर्धित कर आणि व्यवसाय करातून अडीच लाख कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आता जीएसटीचा स्लॅब बदल्यामुळे राज्याच्या महसुलात नेमकी किती घट होईल, हे लवकरच स्पष्ट होईल. जीएसटी बदलाची अंमलबजावणी घटस्थापनेपासून करण्याचे निश्चित करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात केंद्राकडून ज्या दिवशी अधिसूचना जारी होईल तेव्हापासून जीएसटीचे दोन स्लॅब लागू होतील, असे या अधिकाऱ्याने सांगितले. कर्नाटक, तेलंगणा, सिक्कीम, पंजाब, पश्चिम बंगाल या बिगर भाजपशासित राज्यांनी प्रास्तवित जीएसटी रचना बदलामुळे राज्याचे आर्थिक नुकसान किती होईल, याचे सादरीकरण जीएसटी परिषदेसमोर केले. या राज्यांनी केंद्राकडे महसुलाच्या नुकसान भरपाईची मागणी केली आहे. मात्र, महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार असल्याने असल्याने राज्याने जीएसटी परिषदेसमोर सादरीकरण केले नाही किंवा संभाव्य नुकसान भरपाईची मागणी केली नाही, अशी माहिती या अधिकाऱ्याने दिली.

**लक्ष्य 18 टक्क्यांचे, जमा 12 टक्के**

दरम्यान, 2024-25 या आर्थिक वर्षात राज्याला जीएसटी आणि अन्य कराच्या माध्यमातून 2 लाख 25 हजार 374 कोटींचे उत्पन्न मिळाले होते. यावर्षी महसुलात 18 टक्के वाढीसह अडीच लाख कोटींचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जुलैपर्यंत महसुलातील वाढ १२ टक्केच आहे, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार, मुंबईसह या जिल्ह्यांना हवामान खात्याचा अलर्ट

**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे. बंगालच्या उपसागरात वायव्येला तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. समुद्राच्या काही भागात चक्रीवादळाची स्थिती आहे. यामुळे उत्तर कोकणासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात चार दिवस मध्यम तसेच तुरळक ठिकाणी मुसळधार ते अती मुसळधार पावसाची शक्यता आहे. ठाणे आणि पालघर जिल्ह्यासह राज्यातील सात जिल्ह्यांना हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. पालघर, ठाण्यात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईत गुरुवारी आणि शुक्रवारी काही



ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. शनिवारी अनंत चतुर्दशीच्या दिवशी मुंबई - ठाण्यात मध्यम सरींची शक्यता आहे. पालघरमध्ये काही ठिकाणी शनिवारी मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने रायगडला गुरुवारी आणि शुक्रवारी, तर रत्नागिरीला गुरुवारी ऑरेंज अलर्ट दिला आहे. तुरळक ठिकाणी अति मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पालघर, ठाणे, रायगड, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्याच्या परिसराला ऑरेंज अलर्ट दिला आहे. मराठवाड्यातील बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. विदर्भामध्ये अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आज पावसाची शक्यता असून उद्यापासून पावसाचा जोर ओसरणार आहे.

# 'ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही; मराठा आरक्षणावर पंकजा मुंडेंची ठाम भूमिका'



**■मुंबई । प्रतिनिधी,**

मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आता यश मिळालं आहे. आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांच्या सातत्यपूर्ण लढ्याला यश आलं असून, मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य केल्याचं जाहीर केलं आहे. या निर्णयानुसार, गावातील लोक, नात्यातील लोक आणि कुळातील लोक यांची चौकशी करून त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामुळे मराठा समाजाला आरक्षणाचा मार्ग सुकर होण्याची शक्यता आहे. या घडामोडींवर राज्याच्या पर्यटनमंत्री पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका मांडली. त्या म्हणाल्या की, आर्थिक मागासलेपण आणि सामाजिक मागासलेपण हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत. मला हे आधीपासूनच असं वाटत आलं आहे आणि पुढेही असंच वाटत राहील, यात कोणताही बदल होणार नाही.

मुंडे म्हणाल्या की, सर्व समाज सुखाने आणि शांततेने नांदावा हीच आपली खरी इच्छा आहे. सामाजिक मागासलेपणाचा प्रश्न ओबीसी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि सरकार या समाजावर अन्याय होऊ नये अशी भूमिका निश्चितच घेईल, असा मला विश्वास आहे. जर नव्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय होतो असे वाटत असेल, तर त्याची तपासणी करण्यासाठी अजून दोन महिन्यांचा कालावधी उपलब्ध आहे. त्या काळात सर्व बाबींचा सखोल अभ्यास केला जाईल. ओबीसी समाजावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही, हा आमचा ठाम शब्द आहे,ह्व असे आश्वासन देतानाच, मुंडे यांनी सांगितले की सरकारकडून अन्याय टाळण्यासाठी आवश्यक ती पावलं आधीच उचलली जात आहेत.

हैदराबाद गॅझेटियर लागू झाल्यानंतर मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणावर मराठा समाजाला त्याचा प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचं स्पष्ट दिसत आहे. कारण, आतापर्यंत जवळपास ५८ लाख ऐतिहासिक नोंदी शोधून काढण्यात आल्या आहेत. या नोंदींच्या आधारे अनेक मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यातील लाखो मराठा कुटुंबांना आरक्षणाचा मार्ग अधिक सुकर होणार असून, समाजात समाधान आणि दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात

**ओबीसीवर अन्याय होऊ नये यासाठी समिती स्थापन**

मराठा समाजासाठी शासनाने जीआर काढला असला तरी त्याचा परिणाम ओबीसी समाजावर होऊ नये, यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असल्याचे पर्यटनमंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे कोणत्याही समाजावर अन्याय होऊ नये, असा सुवर्णमध्य राज्य सरकार काढेल अशी प्रार्थना आणि अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मोदींच्या हल्ल्याने विरोधक घायाळ



येऊ घातलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजद आणि काँग्रेस यांची टक्कर भाजपशी म्हणजेच मोदी आणि नितीश कुमार यांच्या आघाडीशी आहे. या निवडणुकीत राहुल गांधी आपल्याकडील सारे डावपेच वापरून पाहत आहेत आणि त्यामुळे निवडणुकीत कसेही करून जिंकायचेच अशा निर्धाराने पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका करत आहेत. याच ओघात त्यांच्या पक्षातील एक किरकोळ नेत्याने एकदा मोदी यांच्या मातोश्री यांच्यावरही टीका केली आणि कोणताही पुत्र असा आईवर झालेला हल्ला सहन करणार नाही. त्यात मोदी यांच्या मातोश्री तर स्वर्गवासी झालेल्या. त्यामुळे मोदी यांनी राहुल आणि राजद या त्यांच्या पिल्लावळीला आपल्या भाषणात पाटणा येथे धारेवर धरले आणि राहुल आणि विरोधी पक्षांवर घणाघाती टीका केली. राहुल हे सरंजामी मानसिकतेतून बोलत असतात आणि त्यांना वाटते की मोदी यांच्यावर जेवढे ते टीका करतात तेवढी लोकांना सहन होते. पण तसे नसते. लोकांना राजकीय प्रतिस्पर्ध्यावर टीका करण्याचा अधिकार आहे पण वैयक्तिक आणि कुणाच्या आईवर आणि खानदानावर टीका करण्याचा कुणालाच अधिकार पोहोचत नाही. मोदी यांनी आपल्या भाषणात रूद्रावतार धारण केला, पण राहुल यांना दोष तरी का द्यायचा. त्यांची आई सोनिया गांधी यांनीही मोदी यांच्यावर टीका केली आहे. त्यामुळे राहुल यांनी आणि विरोधीपक्षांनी मोदी यांच्या दिवंगत मातोश्रींवर टीका करणे हे परंपरेला साजेसेच झाले. काँग्रेस जशी सत्तेतून हद्दपार झाली आहे, तशी सैरभेर झाली आहे आणि दिसेल त्यांच्यावर ती टीका करत सुटते. कारण काँग्रेसवाल्यांना वाटत होते की हा देश म्हणजे त्यांची जहांगीर आहे आणि कायमस्वरूपी तो त्यांच्याच ताब्यात दिला आहे. पण मोदी यांनी काँग्रेसच्या या विचारांना सुरूंग लावला आणि तेव्हापासून काँग्रेसची तळपायाची आग मस्तकात जाऊ लागली. भाजपही विरोधीपक्षात होता तोही सरकारच्या कारभारावर टीका करत असे. पण त्याने अशा खालच्या पातळीवर जाऊन कधीही टीका केली नव्हती. अगदी आणिबाणीच्या काळातही. अगदी नेहरूंच्या काळातही भारताने चीनकडून पराभव पत्करला तेव्हाही राम मनोहर लोहिया यांनी नेहरूंवर प्रचंड टीका केली पण जनसंघ शांत राहिला. स्थानिक काँग्रेस समर्थक महंमद रिझवी यांनी मोदी यांच्या दिवंगत आईवर टीका केली आणि मग मोदी यांच्या संतापाचा पारा चढला. विरोधीपक्ष म्हणून त्यांच्या धोरणांवर टीका करणे एक वेळ ठीक, पण दिवंगत आईवर टीका करणे हे कुणालाही शोभत नाही. मात्र काँग्रेसतर्फे कुणीही याबद्दल क्षमायाचनाही केली नाही. हा राजकीय उद्दामपणा आहे आणि तो राहुल काय पण सर्व गांधी घराण्यात मुरलेला आहे. राहुल यांची बिहार विधानसभा निवडणुकीत बोलती बंद झाली आहे. अनेकवेळा त्यांनी आयोगावर टीका केली आणि प्रत्येकवेळी त्यांना आयोगाने फटकारले आहे. पण त्यातून धडा घेतील, तर ते राहुल गांधी कसले. वीर सावरकर यांच्यावरील टीकेच्यावेळीही तसेच झाले. राहुल हे स्वतःला युवराज समजतात आणि त्यामुळे त्यांना वाटते सारी जनता त्यांची गुलाम आहे. पण ५५ वर्षांच्या या नेत्याला अजूनही देशात कोणत्याही राज्यात देदीप्यमान यश मिळवता आले नाही. तरीही काँग्रेसवाल्यांना वाटते की राहुल हे काँग्रेसला पूर्वीचे यश मिळवून देतील. पण राहुल त्याबाबतीत अपयशी ठरले. मोदी यांच्या मातोश्रींवरील टीकेबाबत बोलायचे तर काँग्रेसच्या मित्रपक्षांनी सारी पातळी सोडली आहे. मोदी यांच्यावर टीका करताना राहुल काय किंवा राजद काय किंवा अखिलेश यांचा समाजवादी पक्ष काय, या सर्वांना राजकारणात किमान नैतिकता राखावी लागते याचेही भान नाही. राहुल यांनी नुकतीच बिहारमध्ये मतचोरीविरोधात यात्रा काढली. पण तिला अत्यल्प प्रतिसाद मिळाला. त्यावरून आपल्या टीकेचे काय पडसाद उमटतात हे राहुल यांना कळायला हवे. विरोधीपक्षांनी कसलेही ताळतंत्र नसल्यासारखे बोलणे सुरू केले आहे. त्यामुळे जनता या विरोधीपक्षांना खास करून राहुल आणि तेजस्वी यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. आपल्या संस्कृतीत मातृ देवो भवः असे म्हटले आहे. सर्वात वरचे स्थान आईला आहे. पण कोणत्याही भारतीय मूल्यांची पर्वा नसलेले विरोधीपक्ष आणि इटलीच्या संस्कृतीत वाढलेले राहुल यांना आईची महती काय कळावी. राहुल हे सत्ता गेल्याने सैरभैर झालेत आणि म्हणून तसे ते वाट्टेल ते आरोप करत आहेत. प्रत्येक राज्यात त्यांनी जेथे यात्रा काढली तेथे त्यांचा पराभव झाला. काँग्रेसला आता या पराभवांचेही काही वाटेनासे झाले आहे. त्यामुळे राहुल यांनी बेताल आरोप करत सुटावे आणि मग आयोगाने त्यांच्या श्रीमुखात लगावली की राहुल यांनी माफी मागावी. आताही राहुल यांनी याच सरंजामी मानसिकतेतून मोदी यांच्यावर आरोप केले. त्यांना चौकीदार चोर हे म्हणावे, तर कधी राफेल विमानांवरून मोदी यांच्यावर टीका करावी, पण प्रत्येकवेळी जनतनेच त्यांचे हे आरोप हाणून पाडले. बिहार विधानसभा निवडणुकीत राहुल आणि तेजस्वी यांना पराभव समोर दिसत आहे. त्यामुळे ते मोदी यांच्यावर टीका करत आहेत आणि त्यांच्या दिवंगत मातोश्रींवरही टीका करतात. पण यातून विरोधीपक्ष जास्तच उघडे पडलेत. प्रत्येकाने याची खूणगाठ बांधून ठेवली पाहिजे. कारण निवडणुका येतात आणि जातात पण शब्द राहतात.

# मराठा-ओबीसी यांच्यात दुही निर्माण होऊ नये



महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा विषय गाजत आहे. काल 2 सप्टेंबर रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना सरकारकडून आरक्षण संदभार्तील शासन आदेश देण्यात आले. त्यानंतर ओबीसी समाज नाराज झाल्यामुळे आता त्यांच्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापन करण्यात आली. मात्र, या आरक्षणाच्या वादात मराठा आणि ओबीसी समाज आमनेसामने आले आहेत. काही वर्षांपासून या दोन्ही समाजातील दुही वाढत आहे. या सामाजिक दुहीमुळे महाराष्ट्राचे हित नाही तर अहित होईल, याची जाणीव सर्वांनी ठेवावी, एवढीच अपेक्षा आहे. वास्तविक सत्ताधार्यांनी आरक्षणाचा प्रश्न संवेदनशीलपणे हाताळणे गरजेचे होते. मात्र, कधी यांना तर कधी त्यांना गोंजारायचे असे धोरण ठेवल्याने दोन मोठ्या समाज घटकात मनभेद वाढू लागले आहेत, जे महाराष्ट्राच्या भल्यासाठी नाही. गेल्या वर्षी 27 जानेवारी रोजी मनोज जरांगे पाटील यांनी नवी मुंबईतील वाशीमध्ये मराठा आरक्षणाच्या विजयाचा गुलाल उधळत जल्लोष केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी बेमुदत उपोषण सोडले होते. त्यावेळी विजयी मुद्रेने जरांगे पाटील मराठवाड्यात परतले होते. आता मुंबईतही जरांगे पाटील यांनी पुन्हा सरकारच्या शासन आदेशानंतर विजयाचा जल्लोष करत बेमुदत उपोषण सोडले आहे. यातून पहिला प्रश्न उपस्थित होतो तो गेल्यावर्षी प्रश्न सुटले होते, मग जरांगे पाटील यांना मुंबईत आंदोलन करण्याची गरज का भासली? तर याचे उत्तर खुद्द जरांगे यांनीच मंगळवारी उपोषण सोडण्यापूर्वी उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासमोर दिले होते. गेल्या वर्षी वाशीत जल्लोष केला आणि अध्यार्तासाने कळलेङ्क म्हणून आता काळजी घेत असल्याचे सूचक विधान त्यांनी केले होते. यातून काय समजायचे ते समजा. वास्तविक जरांगे पाटील मुंबईत बेमुदत उपोषणाला बसणार हे त्यांनी चार महिने अगोदरच स्पष्ट केले होते. त्यामुळे हजारो कार्यकर्त्यांसह ऐन गणेशोत्सवाच्या काळात त्यांना मुंबईत येऊ न देता रोखण्याची जबाबदारी सरकारची होती. मात्र, या काळात सरकारने ना त्यांच्याशी चर्चा केली ना कार्यवाहीच्या दिशेने पाऊल उचलले. मात्र, जरांगे पाटील हजारो आंदोलकांसह मुंबईत दाखल झाल्यानंतर आणि त्यांच्या आंदोलनामुळे मुंबईचा फज्जा उडाल्यानंतर सरकारचे आंदोलकांवर नियंत्रण नसल्याचे स्पष्ट झाले. शिवाय जरांगे पाटील मुंबईत दाखल झाल्यानंतर त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सरकारने पहिले पाऊल न उचलल्याने परवानगीशिवाय जरांगे पाटील पाच दिवस आझाद मैदानात बेमुदत आंदोलन करत होते. हजारो आंदोलकांची गर्दी, महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोरील तलावात आंघोळ करणे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये आंदोलकांची घोषणाबाजी, स्टेशनमध्ये झोपणे, रुळांवर उतरून आंदोलन करणे, मराठा आंदोलकांच्या शेकडो गाड्यांमुळे वाहतूक कोंडी, अस्वच्छ झालेला फोर्ट परिसर याचा मुंबईकरांना त्रास झाला. एवढे होऊनही सरकार ढिम्म होते. महाराष्ट्राच्या राजधानीत हजारो आंदोलकांसह ऐन गणेशोत्सवात आंदोलन सुरू असतानाच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यात ताळमेळ नसल्याची जोरदार चर्चा होती. मात्र, मुंबईकरांच्या मदतीला मुंबई उच्च न्यायालय धावून आले आणि त्यानंतर सरकारला कारवाई करण्यासाठी पुढे यावे लागले.मुंबई पर्यटन

सरकारच्या बेपर्वाईमुळे दक्षिण मुंबई चार दिवस बेवारस असल्याचा नोकरदारांना आणि येथील रहिवाशांना अनुभव आला. एका दुकानात चोरीचे फुटेज व्हायरल झाल्यामुळे आंदोलकांच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचला होता. त्यामुळे दुकानदारांनी दुकाने बंद ठेवली. यातून आंदोलकांवर कुणाचेही नियंत्रण नव्हते आणि सरकारचे अस्तित्व जाणवत नव्हते हे स्पष्ट झाले. आता जरांगे पाटील यांच्या उपोषणाला यश मिळाले असे म्हटल्यास याचे श्रेय प्रथम मुंबई उच्च न्यायालयाला द्यावे लागेल. कारण न्यायालयाने त्यांच्या आंदोलनाची आणि मुंबईकरांना होर्णाया त्रासाची गंभीर दखल घेतली. त्यानंतर उच्च न्यायालयाने 2 सप्टेंबर रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत आंदोलकांना आझाद मैदान आणि फोर्ट परिसर खाली करण्याचा आदेश दिल्यानंतर खर्या अथार्ने सरकारला कर्तव्याची जाणीव झाली. विशेष म्हणजे जरांगे पाटील यांनी आंदोलनाचा इशारा देऊनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले होते. ते मुंबईत दाखल झाल्यानंतर मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. यातून सरकार आंदोलनाबाबत किती बेफिकीर होते, हे लक्षात येते. आता राहिला प्रश्न जरांगेंच्या आंदोलनाच्या यशाचा तर त्यावरही काही प्रश्न उपस्थित होत आहेत. मराठा आणि कुणबी एकच आहेत, या निर्णयासाठी दोन महिन्यांची तर सातारा गॅझेट लागू करण्यासाठी एका महिन्याची मुदत सरकारला जरांगेंनी दिली आहे. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन सरकारने यापूर्वी अनेकदा जरांगेंना दिले होते. आताही सरकारने तेच सांगितले आहे. तसेच हैदराबाद गॅझेट सरकारने आधीच स्वीकारले होते. मग आता जीआर काढून वेगळे काय केले, हा प्रश्न आहेच. मराठा आंदोलनात बळी पडलेल्या युवकांच्या कुटुंबांना आर्थिक मदत आणि त्यांच्या कुटुंबातील एकाला नोकरी देण्याचे धोरण सरकारने आधीच स्वीकारले आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तशी मदत देण्यात आली होती आणि नोकरीही दिली होती. आता सरकारने जरांगे यांच्या मागण्या मान्य करून आंदोलन शांत केले आहे, पण त्यातून मराठा आणि ओबीसी यांच्यातील दुही वाढू नये हीच अपेक्षा.

# बंडखोर मुलगी

कल्वकुंतला कविता लोकांना माहीत आहेत के. कविता नावाने. तेलंगणातील भारत राष्ट्र समितीच्या त्या आमदार होत्या. पक्षातून निलंबित करण्यात आल्यानंतर त्यांनी पद सोडले आणि पक्षही. त्यांची वक्तव्ये आणि कारवाया पक्षाला अडचणीत आणत असल्याचे कारण यासाठी दिले गेले. हा निर्णय खुद्द त्यांचे पिता आणि तेलंगणचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी घेतला. त्यामुळे सध्या पक्षात कविता विरुद्ध त्यांचे पिता आणि तीन भाऊ असे चित्र आहे. ही धूसफूस अनेक दिवस सुरू होती. के. टी रामाराव हे कविता यांचे सख्खे, तर हरीश राव आणि संतोष राव हे चुलत भाऊ. या तिघांच्या भ्रष्टाचारामुळे वडिलांची प्रतिमा मलीन होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. कविता मूळच्या तंत्रज्ञ. त्यांनी बीटेकनंतर अमेरिकेतून एमएस केले. तिथे काही काळ नोकरीही केली. २००६मध्ये त्या मायदेशी परतल्या. तेलंगण जागृती या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी महिला आणि तरुणांमध्ये काम केले. हजारो तरुणांना कौशल्य शिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळवून देण्याचे श्रेय ह्यतेलंगण जागृतीक्ककडे जाते. याच महिला आणि तरुण नंतर त्यांना सत्तेच्या सोपानापर्यंत घेऊन गेले. कविता आणि केटीआर या भावंडांत नेहमीच सुप्त संघर्ष राहिला.

खुशखबर! देशभरात ऋऋळ चे दोन स्लॅब रद्द, काय महाग आणि काय स्वस्त?

दिल्ली मद्यघोटाळा प्रकरणात कविता यांना तुरुंगवासही घडला. पक्षाने सत्ता आधीच गमावली होती, या प्रकरणामुळे कविता आणखी एकट्या पडल्या. त्यात मे महिन्यात त्यांनी केटीआर आणि अन्य सहकाऱ्यांविरोधात लिहिलेले पत्र माध्यमांकडे पोहोचले आणि पक्षातील दरी समोर आली. त्यानंतर पक्षांतर्गत नेमणुकांमध्येही कविता यांना डावलण्यात आले.

संतापलेल्या कविता यांनी अखेर जाहीरपणे स्वपक्षीय आणि आप्तांवर आरोपांच्या फैरी झाडल्या. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई अपेक्षितच होती. पक्ष आणि कुटुंबाविरोधात उभ्या ठाकलेल्या कविता यांना आता तेलंगणाची जनता किती पाठबळ देते, हे काळच ठरवेल.

# भारताच्या भविष्यासाठी खेळाधारित शिक्षण

आपल्याला विकसित भारत घडवायचा असेल, तर जिथून जीवनाची सुरुवात होते तिथूनच आरंभ करायला हवा. आपल्या सर्वात तरुण नागरिकांच्या क्षमतेचे संगोपन करून, अंगणवाडी केंद्रांमधील बालकांच्या निरागस हास्यामधून, त्यांच्या बडबडगीतांमधून आणि ते तयार करत असलेल्या खेळण्यांच्या ब्लॉक्समधून आपल्या राष्ट्राच्या भविष्याचे वचन पूर्ण होते.

आजच्या भारतात खेळ केवळ वेळ घालवण्याचे साधन राहिलेले नाही, तर ते आहे एक धोरण आणि त्याचे परिणाम स्वतःच बोलके आहेत. गेल्या दशकात, मोदी सरकारने बालविकासाच्या दृष्टिकोनात मूलभूत पातळीवर पुनर्रचना केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा क्षण, ज्यावेळी मेंदूचा ८५ % पर्यंतचा विकास सहा वर्षांच्या वयाच्या आधी होतो हे मान्य करण्यात आले तो होय. जर आपल्याला अधिक कुशाग्र, सुदृढ आणि अधिक निर्माणक्षम लोकसंख्या हवी असेल तर आपल्याला तिथेच गुंतवणूक करायला हवी, जिथे तिची अत्याधिक आवश्यकता आहे. आयुष्याच्या पहिल्या सहा वर्षांमध्ये. वैज्ञानिक पुरावेदेखील याचे समर्थन करत आहे. सीएमसी वेल्लोर येथील क्लिनिकल एपिडेमियोलॉजी विभागाने केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे, की ज्या मुलांना १८ ते २४ महिन्यांच्या संरचित बालपणाच्या काळात योग्य देखभाल आणि शिक्षण मिळाले त्यांच्या बुद्ध्यांकामध्ये लक्षणीय आणि कायमस्वरूपी वाढ दिसून आली. पाच वर्षांच्या वयापर्यंत १९ गुणांपर्यंत आणि नऊ वर्षांच्या वयापर्यंत ५ ते ९ गुणांपर्यंत. विकसनशील भारतासाठी हे फायदे खूप महत्त्वाचे आहेत. भारताचे हे निष्कर्ष जागतिक संशोधनाशी सुसंगत आहेत. जी बालके पाच वयोवर्षाच्या आत दर्जेदार प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमात सहभागी होतात, त्यांचा बुद्ध्यांक अधिक असण्याची शक्यता ६७% जास्त असते, त्यांच्यात उत्तम सामाजिक कौशल्य आणि सुधारित शैक्षणिक कामगिरी दिसून येते असे आंतरराष्ट्रीय अभ्यासातून दिसून आले आहे. या संदर्भात नोबेल पारितोषिक विजेते डॉ. जेम्स हेकमन यांचे प्रसिद्ध वाक्य, जितके लवकर तितके चांगले-आणि तितके त्याचे परिणाम बुद्धिमान. त्यांच्या संशोधनातून असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, की बालपणातील गुंतवणूक १३-१८ % परतावा देते, म्हणजे शिक्षण किंवा नोकरीतील प्रशिक्षणाच्या इतर कोणत्याही टप्प्यापेक्षा जास्त. प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमाचे आर्थिक आणि सामाजिक महत्त्व ओळखून महिला आणि बालविकास मंत्रालयाने पोषण भी पढाई भी हे अभियान सुरू केले आहे, जे आहे अंगणवाडी केंद्रांना चैतन्यशील शिक्षण केंद्रात रूपांतरित करण्याचे अभियान. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पहिल्यांदाच प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले आहे, ज्यामध्ये स्थानिक आणि देशांतर्गत साहित्यसामग्रीचा अवलंब करून कृती आधारित आणि खेळ केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात येत आहे. अध्यापन-ज्ञानार्जनासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूदीतही लक्षणीय वाढ करण्यात आली आणि मासिक दिवस निश्चित करण्यात आले आहे. आज अंगणवाडी केंद्र हे केवळ पोषणाचे ठिकाण नसून ते प्रत्येक बालकाचे पहिले विद्यालय आहे, जिथे मुलांच्या बालपणातील अत्यंत महत्त्वाच्या काळात जिज्ञासा, सर्जनशीलता आणि सर्वांगीण विकासाचे पोषण करते.

या परिवर्तनाच्या प्रक्रियेला मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रालयाने ३-६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी आधारशिला या नावाने प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम तयार केला आहे. आधारशिला अंतर्गत बालकांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित केले जाते. यामध्ये केवळ बौद्धिक विकासावर नव्हे, तर भावनिक, शारीरिक आणि सामाजिक क्षम कल्याणावर देखील भर दिला जातो. या अंतर्गत संरचित खेळांवर आधारित शिक्षणाचा दृष्टिकोन अंगीकारून मुलांना पोषक वातावरणात प्रगतीचे द्वार खुले केले जाते. मुले स्वाभाविकरित्या खेळाकडे आकर्षित होतात. योग्य वातावरणाच्या साथीने हाच अंतर्भूत घटक आयुष्यभराच्या शिक्षणाचा पाया बनतो. पोषण भी पढाई भी हे अभियान सुरक्षित, संरचित आणि उत्साही वातावरण प्रदान करुन या अनुभूतीला समृद्ध करते जिथे मुले मार्गदर्शित खेळ आणि शिक्षणाद्वारे विकसित होऊ शकतात. पोषण भी पढाई भी अभियानाअंतर्गत देशभरातील अंगणवाडी केंद्रे प्रारंभिक शिक्षणासाठीची पोषक केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. संरचित आधारशिला ५+१ साप्ताहिक योजना सुनिश्चित करते यामध्ये अंगणवाडीतील दिवस ३० मिनिटांच्या खुल्या वातावरणातील खेळाने सुरु होतो, त्यानंतर भाषाविषयक तसेच मुलांमधील सर्जनशीलता वाढवणारे खेळ, गतीप्रेरक कौशल्ये आणि संवाद कौशल्य यांसारख्या विशिष्ट कृती मुलांकडून करून घेतल्या जातात. त्यानंतर पोषक आहार आणि विश्रांती झाल्यानंतर दिवसाचा समारोप मैदानी खेळ तसेच मूल्यात्मक आणि भावनिक बंध दृढ करणाऱ्या संभाषणाने होतो.

संरचित आणि असंरचित खेळांचा अंतर्भाव केलेला हा संतुलित दृष्टिकोन महत्त्वाचा असून विशेषतः राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० ने औपचारिक शालेय प्रवेशाची वयोमर्यादा सहा वर्षे इतकी निश्चित केल्याने त्याचे महत्त्व अधोरेखित होते. संरचित प्रारंभिक बालव्यवस्था देखभाल आणि शिक्षण उपक्रमामुळे बालके भावनिक, सामाजिक आणि आकलनाच्या पातळीवर शाळेत प्रवेश करण्यास सज्ज असल्याचे सुनिश्चित केले जाते. सर्वात उत्साहजनक गोष्ट ही आहे, की देशभरातील पालकांचा यावरील विश्वास वृद्धिंगत होतो आहे.

जी कुटुंबे एके काळी अंगणवाडी केंद्रांना केवळ पोषण केंद्र म्हणून पाहत असत ते आता त्यांच्या पाल्याच्या शैक्षणिक प्रवासातील पहिली पायरी म्हणून त्याकडे पाहत आहे. भारतातील प्रत्येक बालकाला एक मजबूत सुरुवात मिळाली पाहिजे. याचे महत्त्व ओळखून महिला बालविकास मंत्रालयाने लहान मुलांच्या प्रारंभिक प्रोत्सहनासाठी नवे चेतना हा राष्ट्रीय आराखडा सादर केला. हा उपक्रम पालक आणि पालनकर्त्यांना सोप्या, खेळांवर आधारित आणि मुलांच्या वयाप्रमाणे कृतींच्या आधारे लहानग्या मनांना घरातच समृद्ध करण्यासाठी सक्षम करतो. माता- पित्यांचा सहभाग हा बालकांच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. एकीकडे उच्च उत्पन्न गटातील पालक आपल्या मुलांसाठी खेळणी आणि पुस्तके खरेदी करण्यात गुंतवणूक करू शकतात; परंतु अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी समान संधी उपलब्ध करून देणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. नवचेतना आणि पोषण भी पढाई भी या अभियानाच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे, जेणेकरून भारतातील प्रत्येक कानाकोपऱ्यातील मुलाला सुरुवातीपासूनच वाढीसाठी आवश्यक असलेले प्रोत्साहन, देखभाल आणि संगोपन मिळेल याची खात्री होईल. भारताला खऱ्या अर्थाने विकसित व्हायचे असेल तर आपल्या सर्वात तरुण पिढीला आयुष्याच्या आरंभीच योग्य सुरुवात मिळणे आवश्यक आहे. खेळ ही काही आरामदायी गोष्ट नव्हे, तर तो शिक्षणाचा पाया आहे. भारतातील प्रत्येक मुलाला शिक्षण, विकास आणि समृद्ध होण्याची संधी मिळेल याची खात्री करण्यासाठी महिला आणि बालविकास मंत्रालय वचनबद्ध आहे, कारण राष्ट्रउभारणीची सुरुवात आपल्या सर्वात तरुण नागरिकांच्या संगोपनापासून होते.

# 'घालीन लोटांगण' सुरू होताच स्वत:भोवती प्रदक्षिणा घालता का?



सध्या गणेशोत्सव सुरू आहे. त्यानिमित्ताने सगळ्या देवादिकांच्या आरती मोठ्या भक्तिभावाने म्हटल्या जातात. ज्यांची आरती पाठ नसते, ते लोक 'जयदेव जयदेव' म्हणत ठेका धरतात. तास दोन तास आरती झाल्यावर वेळ येते शेवट करण्याची! त्यावेळी आपण जे पद म्हणतो तो संत नामदेवांनी लिहिलेला एक अभंग आहे. त्यातील समर्पित भाव पाहता तो अभंग आरती नंतर म्हणण्याचा प्रघात सुरू झाला.

आरती म्हणजे आर्ततेने मारलेली हाक आणि त्याचा शेवट ज्या अभंगाने केला आहे त्यात देवाशी संवाद साधत नामदेवांनी म्हटले आहे, 'भगवंता, यदाकदाचित जेव्हा तू आम्हाला भेटशील तेव्हा मी तुज्यासमोर लोटांगण घालेन आणि चरणांना वंदन करेन.'

हा भावार्थ लक्षात घेता 'घालीन लोटांगण' हे चरण सुरू झाल्यावर आणि आरती संपण्यापूर्वी स्वतः भोवती प्रदक्षिणा घालण्याची गरज नाही. तसे करण्याबद्दल शास्त्रात कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे आरती संपेपर्यंत देवाभोवती आणि स्वतः भोवती प्रदक्षिणा न घालता आरती पूर्ण करावी. नंतर मंत्रपुष्पांजली म्हणून झाल्यावर मंदिराला प्रदक्षिणा घालावी आणि नंतर देवासमोर साष्टांग नमस्कार घालावा. जिथे देवाभोवती प्रदक्षिणेसाठी जागा नसेल तिथे आरती संपल्यावर स्वत:भोवती प्रदक्षिणा घालून साष्टांग नमस्कार घालावा असे शास्त्र आहे.

स्वतः भोवती प्रदक्षिणा घालण्याचा मंत्र :

यानि कानि च पापानि
जन्मांतरकृतानि च
तानि तानि विनश्यन्ति
प्रदक्षिणपदे पदे

हा मंत्र म्हणत तीन वेळा प्रदक्षिणा घालत प्रार्थना केली जाते, की 'हे देवा माज्याकडून कळत-नकळत झालेल्या पापांचे क्षालन कर, केवळ या जन्मातलेच नाही तर मागच्या जन्मातील पापेही नष्ट कर.'


लोटांगण : स्वत:भोवती प्रदक्षिणा घालून झाल्यावर देवासमोर लोटांगण घालावे. लोटा अर्थात सपाट बुड असलेला तांब्या जसा जमिनीवर अलगद टाकला असता जसा घरंगळत जातो आणि वतुर्ळाकार फिरतो, तसा देवासमोर देह टाकून डोक्याच्या वर सरळ रेषेत हात जोडून स्वत:भोवती लोळत लोळत देवाभोवती प्रदक्षिणा करणे म्हणजे लोटांगण. तसे करताना देवासमोर डाव्या बाजूला तीन वेळेस आणि उजव्या बाजूला तीन वेळेस लोळण घेणे आणि मूळ जागी येऊन साष्टांग नमस्कार घालणे याला लोटांगण घालणे असे म्हणतात.

मात्र सगळ्या ठिकाणी किंवा घरगुती ठिकाणी लोटांगण घालण्यासाठी पुरेशी जागा नसते, अशा वेळी वरील श्लोक म्हणत आरती झाल्यावर स्वतः भोवती प्रदक्षिणा घालावी असे सांगितले जाते.

साष्टांग नमस्कार स्त्रियांनी घालू नये :

साष्टांग नमस्कार म्हणजे ज्यात अष्ट अंग जमिनीला टेकतात त्याला सह अष्ट अंग अर्थात साष्टांग नमस्कार असे म्हणतात. यात डोकं, दोन्ही हात, दोन्ही पाय, हृदय, दोन्ही डोळे जमिनीला टेकतात. मात्र शास्त्रानुसार स्त्रियांनी पंचांग नमस्कार घातला पाहिजे. त्यात दोन गुडघे, दोन हात आणि डोकं जमिनीला टेकले पाहिजे. स्त्रियांनी आपले पूर्ण शरीर जमिनीवर पालथे पडू देऊ नये, म्हणून त्यांनी पंचांग नमस्कार करावा असे सांगितले आहे.त्यामुळे पुढच्या वेळी आरती झाली की सगळे प्रदक्षिणा घालतात म्हणून तुम्ही सुद्धा घालीन लोटांगण सुरु होताच प्रदक्षिणा घालू नका. आरती पूर्ण करा आणि आरती झाल्यावर इतरांनाही ही माहिती देऊन त्यांच्या ज्ञानात भर घाला!

# अनंत चतुर्दशी, चंद्रग्रहणात अशुभाची छाया; चुकूनही 'ही' कामे करू नका!



चातुर्मास सुरू आहे. गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. भाद्रपद पौर्णिमेला खग्रास चंद्रग्रहण असणार आहे. हे खग्रास चंद्रग्रहण संपूर्ण भारतात दिसणार आहे. परंतु, अनंत चतुर्दशी आणि खग्रास चंद्रग्रहणावेळी मृत्यू पंचक लागणार आहे. मृत्यू पंचक म्हणजे काय? नेमकी कोणती कामे किंवा गोष्टी या काळात करू नये? जाणून घेऊया...

ज्योतिषात ग्रह-नक्षत्रांचा अधिक विचार केला जातो. पंचांगाचे तिथी, वार, योग, ग्रह-नक्षत्र, मुहूर्त, करण मुख्य भाग असून, यामधील पंचक काल सर्वाधिक महत्त्वाचा मानला जातो. पंचक लागण्याची वेळ, मुहूर्त शास्त्रात अत्यंत महत्त्वपूर्ण मानला गेला आहे. पंचक कालावधीत शक्यतो शुभ कार्य केले जात नाही. पंचक कालावधी हा अमंगलाचे सूचक मानला गेला आहे. पुराणातील काही उल्लेखांनुसार, रामायण काळात श्रीरामांनी रावणाचा वध केला, तेव्हा पंचक लागले होते. पंचक काळात कोणाचा मृत्यू झाला असेल, तर ते अशुभ मानले जाते.

मृत्यू पंचक म्हणजे काय?

ज्योतिषशास्त्रानसार, पाच नक्षत्रांच्या विशिष्ट कालावधीला पंचक म्हटले जाते. चंद्राचे धनिष्ठा नक्षत्राचे तृतीय चरण आणि शततारका, पूर्वा भाद्रपदा, उत्तरा भाद्रपदा, रेवती या नक्षत्रांमधील भ्रमण कालावधीला पंचक मानले जाते. काही मान्यतांनुसार, या काळात केलेल्या अशुभ कार्यांचा पाचपट प्रभाव पडत असतो. खगोल विज्ञानाच्या दृष्टिकोनातून ३६० अंशाच्या भचक्रात पृथ्वीच्या ३०० डिग्री ते ३६० डिग्री मध्य भ्रमणाच्या कालावधीला पंचक मानले जाते. शनिवारी पंचक सुरू झाले तर त्याला मृत्यू पंचक असे म्हटले जाते. शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.२२ वाजेपासून पंचक सुरू होत आहे. बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ०४.०३ वाजता पंचक समाप्त होणार आहे. मृत्यू पंचक अतिशय कष्टदायी, प्रतिकूल मानले जाते. पंचक कालावधीत चंद्राचा पृथ्वीवर सर्वाधिक प्रभाव असल्याचे मानले जाते.

मृत्यू पंचक काळात काय करू नये?

- पंचक सर्व कार्यांसाठी अशुभ नसते, तर काही कार्यांसाठी पंचक अत्यंत शुभ मानले जाते. या कालावधीत यात्रा करणे, मुंडन कार्य, व्यापार आदी कार्यांसाठी पंचक शुभ मानले गेले आहे. तसेच साखरपुडा समारोह, विवाह आदी शुभ कार्ये पंचक कालावधीत केली जाऊ शकतात.

- परंतु, सप्टेंबर महिन्यात लागणाऱ्या पंचक कालावधीत चंद्रग्रहण आणि पितृपक्ष सुरू होत आहे.

- पंचक कालावधीत काही कार्ये करणे निषिद्ध मानले गेले आहे. पंचक कालावधीत लाकडाची खरेदी करू नये. घराच्या छताच्या दुरुस्तीचे किंवा नवीन बांधकाम करू नये. पंचक काळात दक्षिण दिशेकडे प्रवास करणे वर्जित मानले गेले आहे. कोणात्याही प्रकारच्या इंधनाचे भंडारण करू नये, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

- पंचक कालावधीत जुळून येणाऱ्या शुभ योगांवर केलेल्या काही कार्यांचा सकारात्मक परिणाम प्राप्त होऊ शकतो. काहीवेळा धनलाभाचे योगही प्रबळ होऊ शकतात. याशिवाय वाहन खरेदी, गृह प्रवेश, शांती पूजन, मालमत्तेशी संबंधित स्थिर कार्ये करणे पंच कालावधीत शुभ मानली गेली आहेत.

- पंचक काळात मृत्यू होणे शुभ मानले जात नाही. पंचक कालावधीत मृत्यू झाल्यास कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, आप्तेष्ट यांच्या जीवितहानीची शक्यता असते. पंचक दोष लागू नये, यासाठी काही उपाय शास्त्रात सांगितले गेले आहेत.

- पंचक कालावधीत कोणाचा मृत्यू झाला, तर ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, त्याचे अंतिम संस्कार करताना दभार्चे एक प्रतीक तयार करून त्याचा दाहसंस्कार मृतकासोबत करण्याचे विधान आहे, असे सांगितले जाते.

- सदर माहिती सामान्य गृहीतके आणि ज्योतिषीय मान्यतांवर आधारित असून, यासंदर्भात तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेणे उपयुक्त ठरू शकेल, असे सांगितले जात आहे.

# अनंत चतुर्दशीचे व्रत पांडवांना कोणी सांगितले? काय लाभ झाला?

कौरव पांडवांमध्ये जेव्हा द्यूत खेळले गेले तेव्हा धर्मराज युधिष्ठिर आपल्याकडील सर्व संपत्ती, वस्तू गमावून बसले. सर्वस्व हरलेल्या पांडवांना त्यानंतर बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास पत्करावा लागला. त्या काळात भगवान श्रीकृष्णांनी त्यांना वनवासात भेट घेऊन युधिष्ठिराला या संकटातून मुक्तता व्हावी म्हणून हे अनंतचतुर्दशीचे व्रत करण्यास सांगितले. विशेष म्हणजे श्रीकृष्णाने त्याला या व्रताची एक कथा सांगितली. ती कथा अशी-

कृतयुगात सुमंतू नामक गुणी ब्राह्मण होता. त्याला एक मुलगी होती. तिचे नाव शीला. या मुलीच्या जन्मानंतर तिची आई मरण पावली. त्यामुळे सुमंतू ब्राह्मणाने पुन्हा लग्न केले. मात्र त्याची दुसरी पत्नी कजाग, भांडखोर होती. यथाकाल शीलाचे लग्न कौंडिण्यमुनीबरोबर झाले. लग्नानंतर ती सासरी जाण्यास निघाली त्यावेळी सुमंतूने पत्नीकडे शीलाला काही वस्तू आंदण म्हणून देण्याचा मनोदय व्यक्त केला. मात्र त्याच्या पत्नीने काहीही देण्यास नकार दिला. उलट मुलीचा आणि जावयाचा विनाकारण अपमान केला. अपमानित शीला दुःखी झाली. ती सासरी जाण्यास निघाली. वाटेत तिने नदीच्या किनारी




काही स्त्रिया एकत्रितपणे पूजा करत असल्याचे पाहिले. ते अनंताचे व्रत होते. तिनेही लगेच पूजेत भाग घेऊन मनोभावे व्रत केले.

व्रतात सांगितल्याप्रमाणे तिनेही स्वतःच्या हातात अनंताचा दोरा बांधून घेतला. नंतर ती सासरी आली. त्या व्रताचे फळ म्हणून तिच्या संसारात समृद्धी आली, सर्व तऱ्हेची सुख, संपदा तिला प्राप्त झाली. कौंडिण्यमुनीला या अचानकपणे प्राप्त झालेल्या भरभराटीचा गर्व जाला. एकदा त्यांनी शीलाच्या हातातला अनंताचा दोरा विनाकारण काढून अग्नीत टाकला. परिणामी अनंताचा त्याच्यावर कोप झाला. अचानकपणे आलेली समृद्धी आल्या पावली वेगाने निघून गेली. पुन्हा दारिद्र्याचे दिवस सुरू झाले.

शीला समजूतदार होती. तिने पतीला त्याची चूक समजावून सांगितली. कौडिण्यमुनीला व्रताचे महत्त्व कळले. ते वनात गेले आणि त्यांनी अनंताचे व्रत करण्याचा निश्चय केला. अनंताचा शोध तो घेऊ लागला. परंतु त्याला अनंताचे दर्शन होईना. त्याने आयुष्य संपवून टाकायचे ठरवले. तेव्हा अनंताने अर्थात भगवान विष्णूंनी त्याला ब्राह्मणरूपात दर्शन दिले. अनंत चतुर्दशीचे व्रत करायला सांगितले. त्याने तसे केले. यथावकाश त्यांना गतवैभव प्राप्त झाले. कौडिण्यमुनीला जसे गतवैभव प्राप्त झाले, तसे पांडवांना प्राप्त व्हावे म्हणून श्रीकृष्णाने युधिष्ठिराला वनवासात असताना हे व्रत अंगिकारायला सांगितले. पांडवांनी तसे केले. त्यानुसार या व्रताचे फल प्राप्त झाले. कथेचे सार काय, तर उतू नका मातू नका घेतला वसा टाकू नका! परिस्थिती बदलत राहते. दुसऱ्यांना कमी लेखू नका. देवकृपेने मिळालेल्या गोष्टींचा आदर करा. आपल्याकडे असलेल्या गोष्टींवर गर्व आणि नसलेल्या गोष्टींचे दुःखं करत न बसता अनंताला साक्ष ठेवून प्रामाणिकपणे आपले काम करत राहा! आपणही हीच प्रेरणा घेत अनंताला साक्ष ठेवून प्रामाणिक पणे आपले काम करावे, ही शिकवण या कथेतून मिळते!

# केवळ गणपतीत नाही, कायम 'हे' स्तोत्र म्हणा; आयुष्यभर जे हवे ते प्राप्त होईल

बुद्धीची देवता, विघ्नहर्ता, सुखकर्ता, १४ विद्या आणि ६४ कला अधिपती असलेला प्रथमेश गणपती समरांगणात अग्रस्थानी लढणारा, आनंदाच्या प्रसंगी मनसोक्त नाचणारा, गोड-धोड आवडीने खाणारा, शिक्षणाची आवड आणि आस्था बाळगणारा असा समाजाच्या सर्व थरांना, सर्वांना आदर्श वाटणारा असा देव.

कोणत्याही शुभ कायार्ची सुरुवात गणपती पूजनाने केली जाते. कोट्यवधी घरांमध्ये दररोज गणपती पूजला जातो. प्रत्येक महिन्यातील दोन चतुर्थ्या गणेश सेवेचा पर्वणी काळ, तर गणेशोत्सव सर्वोच्च आनंदाचा, चैतन्याचा आणि असीम उत्साहाचा कालावधी. मराठी वर्षात लाडक्या गणपती बाप्पाचे तीन जन्म मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. विविध स्वरुपात गणपतीचे पूजन केले जाते. गणेशविषयक विशेष दिवस वैशाख पौर्णिमेपासून सुरू होतात, अशी मान्यता आहे. गणपतीच्या वेगवेगळ्या अवतारांपैकी तीन जन्मदिवस अत्यंत महत्त्वाचे मानले आहेत. यापैकी एक वैशाख पौर्णिमेला पुष्टिपती विनायक जन्म, भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजचे गणेश चतुर्थी आणि माघ महिन्यातील चतुर्थी म्हणजेच गणेश जयंती. चतुर्थी तिथी श्रीगणेशाची अत्यंत प्रिय तिथी आहे. चतुर्थी म्हणजे जागृती, स्वप्न, सुषुप्ती यांपलीकडील तुरीया अवस्था होय. तेच जीविताचे परमाध्य, असे मानले जाते. गणपती बुद्धीची देवता आहे. गणपती ही वैश्विक देवता आहे. गणेश ही प्रेरणा देणारी देवता आहे. विविध कलांच्या अविष्काराने सर्वांशी खुला संवाद साधणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे हे दैवत. पराक्रमी असले तरी कोपिष्ट नाही, तेजस्वी असले तरी तापहीन असे हे दैवत. यामुळेच देवत्व असलेला गणपती जवळचा आणि आपल्यातलाच वाटतो. गणेशोत्सवात काही स्तोत्रे आवर्जून म्हटली जातात. गणपतीच्या अनेक स्तोत्रांपैकी एक म्हणजे गणपती अथर्वशीर्ष. याची गणेशोत्सवात अनेक ठिकाणी आवर्तने केली जातात. परंतु, केवळ विनायक चतुर्थी, संकष्ट चतुर्थी, गणेशाचे जन्मोत्सव किंवा गणपती गणेशोत्सवापुरते नाही, तर नियमित कायम हे स्तोत्र म्हणणे अतिशय शुभ पुण्य फलदायी मानले गेले आहे.

गणपती अथर्वशीर्ष नेमके काय आहे?

अथर्वशीर्ष हे एक उपनिषद आहे. ते अथर्ववेदाशी संबंधित आहे. यामध्ये गणेशविद्या सांगितलेली आहे. गणेशाच्या उपासकांमध्ये या उपनिषदाला विशेष महत्व आहे. अथर्वशीर्ष हे गणक ऋषी यांनी लिहिले आहे. थर्व म्हणजे चंचल आणि अथर्व म्हणजे स्थिर. शीर्ष म्हणजे मस्तक. ज्याच्या पठणामुळे बुद्धीला स्थिरता येते, असे उपनिषद म्हणजे अथर्वशीर्ष होय, असा याचा अर्थ लावला जातो. यात प्रथम गणपतीच्या सगुणब्रह्माची उपासना सांगून शेवटी गणपती म्हणजेच परब्रह्म होय, असे म्हटले आहे. गणपती हा तीन देहांच्या पलीकडचा असला, तरी ॅगंॅ हे त्याचे तांत्रिक शरीर आहे आणि तोच त्याचा महामंत्रही आहे. गणपती हा विश्वाचा आधार असून, तो ज्ञान आणि विज्ञानमय आहे. व्रातपती, शिवाच्या गणांचा अधिपती असा असलेल्या गणपतीला यामध्ये नमस्कार केलेला आहे. यानंतर याची फलश्रुती सांगितलेली आहे. या उपनिषदाचे एक हजार वेळा पठन केल्याने जे हवे ते प्राप्त होईल, असे म्हटले आहे. गणपती अथर्वशीर्ष अत्यंत प्रभावी मानले गेले असले तरी ते म्हणताना काही नियम अवश्य पाळावेत, असे सांगितले जाते.

अथर्वशीर्ष म्हणताना कोणते नियम नक्कीच पाळावेत?

- अथर्वशीर्ष म्हणण्यापूर्वी स्नान करावे.

- अथर्वशीषार्चा पाठ करताना धूतवस्त्राची घडी, मृगाजिन, धाबळी किंवा दभार्ची चटई यांचा उपयोग करावा.

- अथर्वशीषार्चा पाठ म्हणताना मांडी पालटावी लागू नये, याची काळजी घ्यावी.

- दक्षिण दिशेखेरीज अन्य कोणत्याही दिशेला तोंड करून बसावे.

- अथर्वशीर्ष पाठ म्हणण्यापूर्वी वडिलर्धायांना तसेच गुरुंना नमस्कार करावा.

- अथर्वशीर्ष पठण करण्यापूर्वी गणपतीची पूजा करून त्याला अक्षता, दूर्वा, शमी आणि तांबडे फूल व्हावे.

- पूजा करणे शक्य नसल्यास गणपतीचे मनोभावे ध्यान करावे, नमस्कार करावा.

- अथर्वशीर्ष पठण भावपूर्वक म्हणजे त्याचा अर्थ समजून केले पाहिजे.

- अथर्वशीर्षाच्या आधी देण्यात आलेला शांतीमंत्र प्रत्येक पठणापूर्वी न म्हणता सुरुवातीस एकदाच म्हणावा.

- उच्चार अगदी स्पष्ट असावे.

- अथर्वशीर्ष अगदी संथपणे एका गतीत म्हणावे.

-अथर्वशीषार्ची एकवीस आवृत्ती म्हणजे एक अभिषेक होय.

- जेव्हा एकापेक्षा अधिक वेळा हे अथर्वशीर्ष म्हणावयाचे असेल, तेव्हा 'वरदमूर्तये नमः।' येथेपर्यंतच म्हणावे. त्यापुढे फलश्रुती देण्यात आली असून, ती शेवटच्या आवर्तनानंतर म्हणावी.

॥ गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ॥

# इच्छित मनोकामनापूर्तीसाठी अनंत चतुर्दशी पासून २१ दिवस म्हणा 'हे' पॉवरफुल स्तोत्र!



६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी आहे. अनंत अर्थात भगवान विष्णूंच्या सर्वव्यापी निर्गुण निराकार शक्तीची पूजा. ही शक्ती सगुण रूपात अवतरली ती विष्णूंच्या दहा अवतारामध्ये. तसेच पांडुरंग, बालाजी हीदेखील विष्णुरूप मानली जातात. म्हणून अनंत चतुर्दशीच्या दिवशी अनंताची अर्थात विष्णूंची पूजा करून पांडुरंगाष्टक, विष्णूसहस्त्रनाम किंवा व्यंकटेश स्तोत्र म्हणावे असे सांगितले जाते. पैकी व्यंकटेश स्तोत्राची माहिती देणारा एक निनामी लेख वाचनात आला. अनेकांना त्या व्रताचा उपयोगही झाला असे म्हटले होते. ज्यांना शक्य आहे त्यांनी हे व्रत जरूर अंगिकारावे, ज्यांना नियम पाळणे शक्य नाही, त्यांनी निदान तिन्ही सांजेला व्यंकटेश स्तोत्र अवश्य म्हणावे.

१) एक मंडल म्हणजे २१ वेळा या स्तोत्राचा पाठ म्हणणे.

२) हे स्तोत्र २१ दिवस (कोणताही दिवस, वार, पक्ष चालतो), रोज अर्धरात्री १२.०० वाजता (शुचिर्भुत होउन), म्हणायला सुरुवात करावी, संपवावे आपल्या गतीने, हरकत नाही, पण सुरु मात्र ठीक १२ वाजता रात्री करावं.

३) ह्या २१ दिवसांत ह्या सर्व गोष्टी जितक्या होऊ शकतील तितक्या टाळाव्या . काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ईर्ष्या, असत्य विर्चा-वर्तन्-वचन, कोणावर अन्याय.करणे टाळावे.

४) रोज रात्री हे स्तोत्र म्हणतांना पूर्वेकडे तोंड करुन निळ्या, आसनावर मांडी घालुन बसावं .

५) एकाग्रतेने, इकडे-तिकडे न पाहाता, कोणाकडेही काहीही लक्ष न देता म्हणावं अथवा वाचावं.

६) २१दिवस पूर्ण झाल्यावर जे काही ईच्छित असेल ते पूर्ण होतेच, असा भाविकांचा अनुभव आहे.

खालील गोष्टींकडे जरा लक्ष द्या :

या सेवे मध्ये काही अज्ञात शक्ती तुम्हाला चक्क बाधा आणतील २१ दिवस काही तुमचे पुरे होऊ देणार नाही, त्या आधीच काहितरी चुक करुन अगदी नीट लक्ष कुठेतरी, कसातरी, कुठुनतरी हे तुम्हाला हे बाधा रहित पणे २१ दिवस पूर्ण होऊ देणार नाही. पण आपण ढळायचे नाही!! . २१ दिवस कसोटीने हे पूर्ण केल्यावर व्यंकटेशाला कुठल्या ना कुठल्या रुपांत तुम्हाला भेटायला यायचे असते. तो तुम्हीच ओळखायचा. हा जागृति, स्वप्न, सुषुप्ती ह्या कोणत्याही आपल्या अवस्थांमध्ये येऊ शकतो !!

शुभं भवतु

ग्रहपीडा निवारण, संकटनिवारण करण्यासाठी अत्यंत प्रभावी स्तोत्र.

श्री व्यंकटेश स्तोत्र

व्यंकटेशो वासुदेवःप्रद्युम्नोऽमितविक्रमः।
संकर्षणो अनिरुद्धश्च शेषाद्रिपतिरेवचः ॥१॥
जनार्दनः पद्मनामो वेंकटाचलवासिनः ।
सृष्टीकर्ता जगन्नाथो माधवो भक्तवत्सलः॥२॥
गोविंदो गोपतिः कृष्णः केशवो गरुडध्वजः ।
वराहो वामनश्चैव नारायण अधोक्षजः ॥३॥
श्रीधरः पुंडरिकाक्षः सर्वदेवस्तुतो हरीः ।
श्रीनृसिंहो महासिंहः सूत्राकारः पुरातनः ॥४॥
रमानाथो महाभर्ता मधुरः पुरुषोत्तमः ।
चोलपुत्रप्रियः शांतो ब्रह्मादिनां वरप्रदः ॥५॥
श्रीनिधिः सर्वभूतानां भयकृद् भयनाशनः ।
श्रीरामो रामभद्रश्च भवबंधैकमोचकः ॥६॥
भूतावासो गिरावासः श्रीनिवासः श्रियःपतिः
अच्युतानंद गोविंद विष्णुवेंकटनायकः ॥७॥
सर्वदेवैकशरणं सर्वदेवैकदैवतं ।
समस्तदेवकवचं सर्वदेवशिखामणिः ॥८॥
इतीदं कीर्तितं यस्य विष्णोरमिततेजसः ।
त्रिकाले यः पठेन्नित्यं पापं तस्य न विद्यते ॥९॥
राजद्वारे पठेद् घोरे संग्रामे रिपुसंकटे ।
भूत-सर्प-पिशाचादि भयं नास्ति कदाचन ॥१०॥
अपुत्रो लभते पुत्रान् निर्धनो धनवान्भवेत् ।
रोगार्ते मुच्यते रोगात बद्धो मुच्येत बंधनात ॥११॥
यद् यदिष्टतमं लोके तत तत प्राप्नोत्यसंशयः ।
ऐश्वर्यं राजसंन्मानं भुक्तिमुक्तिफलप्रदम् ॥१२॥
विष्णोलोर्कैकसोपानं सर्वदुःखैकनाशनं ।
सर्वऐश्वर्यप्रदं नृणां सर्वमंगलकारकम् ॥१३॥
मायावी परमानंद त्यक्त्वा वैकूठमुत्तमं ।
स्वामिपुष्करिणीतीरे रमया सह मोदते ॥१४॥
कल्याणाद्भूत गात्राय कामितार्थप्रदायिने ।
श्रीमद् वेंकटनाथाय श्रीनिवासाय ते नमः ॥१५॥

सदर माहिती सामान्य गृहीतके आणि ज्योतिषीय मान्यतांवर आधारित असून, यासंदर्भात तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला घेणे उपयुक्त ठरू शकेल!

# कामगारांच्या कामांच्या तासांमध्ये वाढ; दुकानात ९ तास तर कारखान्यांत १२ तास काम करण्याचा नियम...



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

कामगार टंचाईवर मात करणे, उद्योगांची कार्यक्षमता वाढवणे तसेच राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण होवून विदेशी गुंतवणूक आकर्षित व्हावी या हेतुन राज्य मंत्रिमंडळाने कारखाने व दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामांच्या तासात वाढ केली आहे. यापुढे दुकानामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रतिदन ९ तास तर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारास प्रतिदिन १२ तास काम करावे लागणार आहे. कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मयार्दा ९ तास होती, ती आता १२ तासांपर्यंत करण्यात आली आहे. कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे होता, तो आता ६ तासानंतर ३० मिनिटे करण्यात आला आहे. आठवड्याच्या कामाचा कायार्चा विस्तार कालावधी साडेदहा तासावरुन १२ तास करण्यात आला आहे.

अतिकालिक कामाच्या तासाची मयार्दा ११५ तास प्रति तिमाही होती, ती अता १४४ तास प्रति तिमाही अशी करण्यात आली आहे. याचबरोबर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार २० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना केवळ हा अधिनियम लागू राहील. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांना नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. यापूर्वी १० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना नियम लागू होता. नव्या नियमानुसार दुकानांमध्ये दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० तास करण्यात आले आहेत. खंडीत किंवा तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचा कार्यकाल साडेदहा तासांवरून १२ तास करण्यात आला आहे. अतिकालिक (ओव्हर टाईम) कामाचा कालावधी १२५ तासांवरुन १४४ तास करण्यात आला आहे. या बदलामुळे उद्योगांची कार्यक्षमता वाढेल, उत्पादन खंडीत होणार नाही, राज्यात गुंतवणूक आकर्षित होईल, कामगारांना अधिक मोबदला मिळेल.

# दागिन्यांच्या जाहिरातीचं शुटींगवेळी मॉडेलच्या गळ्यातील हिऱ्याच्या दागिन्याची चोरी

■मुंबई। प्रतिनिधी:

दागिन्यांच्या जाहिरातीच्या चित्रीकरणावेळी मॉडेलच्या गळ्यातील ११ लाख रुपयांचा हिऱ्याचा दागिना चोरीला गेल्याची घटना अंधेरीतील ब्लॅक फ्रेम स्टुडिओमध्ये २८ ऑगस्टला घडली आहे. या प्रकरणी अंबोली पोलिसांनी अनोखळी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



खासगी ज्वेलरी कंपनीच्या ऑनलाइन मार्केटिंगची जबाबदारी सांभाळणाऱ्या श्रद्धा दोडमानी यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. कंपनीची जाहिरात आणि प्रसार करण्यासाठी २८ ऑगस्टला त्यांनी ब्लॅक फ्रेम स्टुडिओत फोटोशूट आणि व्हिडिओग्राफीचे आयोजन केले होते. त्यासाठी त्यांनी ६० दागिने नेले, तर या दरम्यान आणखी १९ दागिने मागवून एकूण ७९ नग वापरले.

त्यानंतर एक दागिना तक्रारदाराने सोबत ठेवत उर्वरित सर्व दागिने व्यवस्थित पॅक करुन परत पाठवले. मात्र, २९ ऑगस्टला रात्री १०.३० वाजता. कंपनीचे डायमंड हेड जिगरभान शेख यांनी ७७ दागिने परत मिळाले असून मॉडेल रिया हिच्या गळ्यात वापरलेला दागिने गायब आहे, असे श्रद्धा यांना कळविले. त्या दागिन्याची किंमत ११ लाख १२ हजार ९१६ रुपये आहे. त्यानंतर तक्रारदाराने स्टुडिओमध्ये तपास केला. मात्र, दागिना कुठेही सापडला नाही. त्यामुळे अंबोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधितांची चौकशी सुरू आहे.

# सात रुपयांत कशी शिजणार 'प्रधानमंत्री पोषण शक्ती'ची खिचडी?

■मुंबई। प्रतिनिधी:

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पूवीर्चे मध्यान्ह भोजन) योजनेअंतर्गत राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांना दररोज गरम, शिजवलेला पौष्टिक आहार मिळणे बंधनकारक आहे. या योजनेतून महाराष्ट्रात सुमारे १.२ कोटी विद्यार्थी लाभ घेतात, असे राज्य शिक्षण विभागाच्या अद्ययावत आकडेवारीत स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, महागाईच्या वाढत्या झटक्यात सरकारकडून दिले जाणारे अनुदान तुटपुंजे ठरत असून योजना अंमलबजावणीत गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिदिवस फक्त ७ रुपये, तर उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ९.७० रुपये इतकीच रक्कम मंजूर केली जाते. या रकमेतून धान्य, डाळ, भाज्या, तेल, मसाले, गॅस आणि वाहतूक खर्च भागवणे जवळपास अशक्य असल्याने शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्या हवालदिल झाल्या आहेत. मानव संसाधन विकास मंत्रालयाने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दररोज १०५ ग्रॅम धान्य, २० ग्रॅम डाळी, ५० ग्रॅम भाज्या आणि आवश्यक तेल-मसाले, तर



सहावी ते आठवीसाठी १५० ग्रॅम धान्य, ३० ग्रॅम डाळी व ७५ ग्रॅम भाज्या देणे बंधनकारक आहे. आहारात कॅलरी, प्रोटीन व सूक्ष्मपोषकांचे प्रमाण निश्चित करण्यात आलेले आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत बाजारभाव वाढल्याने या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे शक्य होत नाही. गॅस सिलिंडरपासून भाज्यांच्या दरापर्यंत सर्वच खर्च वाढल्याने शिक्षकांना विद्यार्थ्यांना योग्य आहार देताना तोटा सहन करावा लागत आहे.

राज्यातील शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे की, प्रतिदिन सात रुपयांत एका मुलाला पौष्टिक खिचडी शिजवणे ही वस्तुतः तडजोड आहे. सरकारकडून मिळणारी रक्कम खचार्चा केवळ एक भाग भागवते. उर्वरित खर्च मुख्याध्यापक, शिक्षक किंवा गावकऱ्यांच्या मदतीने उचलावा लागतो. यामुळे योजनाचा मूळ हेतू कुपोषण निर्मूलन असून तोट धोक्यात आला आहे.

# 20 कोटींचे कर्ज मिळालेच नाही, मात्र 40 लाखांची फसवणूक झाली




■मुंबई। प्रतिनिधी:

कर्जाच्या आमिषाने उत्तर प्रदेशातील एका व्यावसायिकाची सहाजणांच्या टोळीने 40 लाखांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी सहाही आरोपीविरुद्ध विनोबा भावे नगर पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. इरफान अहमद शेख, अमोल पवार, तौफीक अहमद सैफुल्ला, रावसाहेब, संजीव मोहनलाल साह आणि राजकुमार सत्यप्रकाश गोस्वामी अशी या आरोपींची नावे आहेत.मुंबई नोकरी

या प्रकरणातील तक्रारदार व्यावसायिक असून ते उत्तर प्रदेशमधील आहेत. लखनऊ विमानतळावर त्यांच्या मालकीचा 3500 चौरस फुटांचा बंगला आहे. हा बंगला ते शूटींगसाठी अनेकदा भाड्याने देत होते. बंगल्याच्या जागी हॉटेल सुरु केल्यास त्यांना चांगला फायदा होईल, असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी बंगल्याचे रुपांतर हॉटेलमध्ये करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी त्यांना कजार्ची आवश्यकता होती. एका मित्रांमार्फत त्यांची वरील सहाजणांशी ओळख झाली होती. त्यांनी त्यांना मुंबईत कर्जाच्या बैठकीसाठी बोलावले होते. एप्रिल आणि मेमध्ये त्यांनी कुर्ल्यामध्ये सहाजणांसोबत मिटींग झाली होती. या बैठकीत सहाजणांनी त्यांना 20 कोटींचे कर्ज देण्याचे आश्वासन देताना कमिशन म्हणून 53 लाखांची मागणी केली होती. त्याला होकार दिल्यानंतर त्यांनी सात दिवसांत कर्ज मंजूर देतो असे सांगितले.

# मुंबई पोलिस, महापालिका, तुम्ही संयम शिकवला!

■मुंबई। प्रतिनिधी:

मराठा आंदोलनाच्या निमित्ताने मुंबईत मोठ्या प्रमाणावर आंदोलक आले. आझाद मैदान आणि आजूबाजूच्या परिसरात प्रचंड गर्दी झाली. कोणत्याही क्षणी, काहीही होऊ शकेल असे सतत वाटत असताना मुंबई पोलिसांनी ज्या पद्धतीने सगळी परिस्थिती हाताळली आणि महापालिकेने एका रात्रीत मुंबई पहिल्यासारखी स्वच्छ केली त्याबद्दल ते शाब्बासकीला पात्र आहेत. महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती आणि त्यांची संपूर्ण टीम ज्या पद्धतीने ६ दिवस काम करत होती त्याला तोड नव्हती. एक दिवसाची परवानगी देण्यात आलेली असताना आंदोलनाला रोज रात्री मुदतवाढ मिळत गेली. पाच दिवस आंदोलन चालू राहिले. लोक मोठ्या प्रमाणावर येतच राहिले. त्यात राज्यभरातून



आलेल्या आंदोलकांना पावसामुळे बसायलाही जागा नव्हती. आजूबाजूच्या खाऊ गल्यांतील दुकाने व्यापाऱ्यांनी बंद ठेवली. त्यामुळे आंदोलकांच्या संतापात भर पडत गेली. ५ हजार लोकांना परवानगी दिली असली तरी प्रत्यक्षात ११ हजारांहून अधिक गाड्या मुंबईत आल्या. जवळपास १२०० गाड्या नवी मुंबईत थांबवल्या गेल्या. दक्षिण मुंबईत ५ हजारांहून अधिक गाड्या आल्या. गदीर्चा आकडा १० ते १५ हजार होईल असा महापालिकेचा अंदाज हुकला. प्रत्यक्षात अवघ्या २ दिवसांत ४० ते ५० हजार लोक आले. एवढ्या सगळ्यांसाठी टॉयलेट, बाथरूम, अंघोळ, पिण्याचे पाणी यांची सोय करण्याचे मोठे आव्हान पालिकेपुढे उभे राहिले. त्यासोबतच खाद्यपदार्थांची पाकिटे आणि होणारा कचरा हा एक वेगळाच विषय होऊन बसला. मराठा आरक्षणासाठी जिद्दीने मुंबईत आलेल्या अनेक आंदोलकांसोबत या सर्व आंदोलनाला गालबोट लावण्यासाठी काही लोक जाणीवपूर्वक गोंधळ घालतील अशी खबर पोलिसांना मिळू लागली. याच कालावधीत मुंबईत वेगवेगळ्या सार्वजनिक गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक विविध गणेश मंडळांना भेट देतात.

# सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर जिल्ह्यांना जोडणारा गगनबावडा घाटात दरड कोसळली



■कोल्हापूर। प्रतिनिधी:

आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता असलेला वैभववाडी तालुक्यातील गगनबावडा घाट दरड कोसळल्याने वाहतुकीसाठी बंद झाला आहे. ही घटना आज, सकाळी ८ वाजता घडली.

गेल्या काही दिवसांपासून या भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटात मोठी दरड कोसळली. या दरडीत मोठे दगड असल्याने ते हटवण्याच्या कामात अडचण येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी असून ढिगारे बाजूला काढण्याचं काम वेगाने सुरू आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी ४ वाजेपर्यंत हा घाट वाहतुकीसाठी पुन्हा खुला होण्याची शक्यता आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी पयार्यी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन केले आहे.

# 'आजपर्यंत आम्ही असा आवाज ऐकला नव्हता..' कामगारांचे नातेवाईक सुन्न, मध्यरात्री माहिती कोण देणार?

■नागपूर। प्रतिनिधी:

सोलार एक्सप्लोजिव्हमध्ये बुधवारी मध्यरात्री साडेबारा वाजता झालेल्या स्फोटानंतर संपूर्ण परिसर हादरला आहे. या स्फोटाच्या वेळी तेथील इकॉनॉमिक युनिट व आजूबाजूला जवळपास ३० ते ४० कामगार काम करत होते. आजूबाजूच्या गावांतून कामगारांच्या नातेवाइकांनी मिळेल त्या साधनाने सोलारकडे धाव घेतली. मात्र, त्यांच्या जीवलगांचे नेमके काय झाले याची कुठलीच माहिती मिळत नव्हती. त्यामुळे अस्वस्थ, अगतिक आणि डोळ्यात अश्रू अशा अवस्थेत शेकडो लोकांच्या मनात केवळ प्रार्थनाच सुरू होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सोलार एक्सप्लोजिव्हमध्ये रात्रपाळीत जास्त लोक कामावर



नसतात. रात्री ३० ते ४० लोक संबंधित युनिटमध्ये काम करत होते. त्यातील किती लोक सुखरूप आहे याची माहिती दीड वाजेपर्यंत कळू शकली नव्हती. या स्फोटाची माहिती मिळताच सर्वच कामगारांच्या नातेवाइकांनी सोलारकडे धाव घेतली. महामार्गावर शेकडो लोक एकत्रित झाले होते. मात्र, आतमध्ये नेमके काय झाले व कामगार कसे आहेत याची माहिती मिळत नव्हती. त्यामुळे अनेकांना अश्रू अनावर झाले होते. कमीत कमी आमचे नातेवाईक सुरक्षित आहेत का हे तरी सांगा असेच अनेक जण म्हणत होते. बहुतांश कामगार हे आजूबाजूच्या गावांतीलच असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सोलार एक्सप्लोजिव्हमध्ये १७डिसेंबर २०२३ रोजी भीषण स्फोट झाला होता व त्यात ९ कामगारांचा मृत्यू झाला होता. हिवाळी अधिवेशन सुरू असतानाच ती घटना घडली होती. सीपीसीएच-२ युनिटमध्ये झालेल्या स्फोटानंतर संपूर्ण परिसर अक्षरशः हादरला होता. त्या युनिटमध्ये कोळसा खाणींसाठी वापरण्यात येणारे कास्ट बूस्टर उत्पादित करण्यात येत होते. स्फोटानंतर क्षणात पूर्ण इमारत पत्त्यांसारखी खाली कोसळली होती. त्या स्फोटाच्या आठवणींनी उपस्थितांच्या अंगावर काटा आला होता.

आजपर्यंत आम्ही असा आवाज ऐकला नव्हता आणि इतका हादरादेखील बसला नव्हता असा दावा त्यांनी केला. दरम्यान, या स्फोटाबाबत माहितीसाठी सोलारच्या कार्यालयात संपर्क केला असता कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

# मिरा-भाईंदर शहरामध्ये डेंग्यू-मलेरियाचे रूग्ण वाढले




■भाईंदर। प्रतिनिधी:

मिरा-भाईंदर शहरात जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या जोरदार पावसामुळे जागोजागी पाणी साचून डेंग्यू आणि मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. तसेच संशयित डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णांच्या संख्येत देखील वाढ झाली आहे. डासांची पैदास रोखण्यासाठी आणि साथीचे आजार नियंत्रणात आणण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ यांनी सांगितले आहे. मिरा-भाईंदर शहरात सध्या मोठ्या प्रमाणात ताप, सर्दीचे रुग्ण आढळून येत असून, खासगी दवाखाने रुग्णांनी भरलेले दिसून येत आहेत. या रुग्णांमध्ये संशयित डेंग्यूची लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. जुलै २०२५ मध्ये ५४ वर्षीय रुग्णाचा हिवतापाने मृत्यू झालेला आहे. भाईंदर पश्चिम येथील राममंदीर परिसरात राहणाया ५३ वर्षीय व्यक्तीचा ३१ ऑगस्ट रोजी संशयित डेंग्यूमुळे मिरा रोड येथील रुग्णालयात मृत्यू झाला असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे. उत्तन व चौक परिसरात गेल्या काही दिवसांत किमान आठ जणांचा मृत्यू झाला आहे. खासगी डॉक्टरांनी हे मृत्यू डेंग्यूमुळे झाल्याचे सांगितले असले तरी महापालिकेच्या आरोग्य विभागात, अद्याप तशी अधिकृत नोंद नसल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# पॅरोलवर असलेल्या आरोपीने केली महिलेची हत्या; आरोपीला रेवदंडा पोलिसांकडून अटक

■अलिबाग। प्रतिनिधी :

खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पॅरोलवर बाहेर आलेल्या आरोपीने एका महिलेची हत्या केली. ही घटना अलिबाग तालुक्यातील महाजने येथील दिवीवाडी इथं सोमवारी घडली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अर्चना चंद्रकांत नाईक असे मृत महिलेचे नाव असून, दत्ताराम नागु पिंगळा असे या आरोपीचे नाव आहे. या दोघांचे प्रेमसंबंध होते.



परंतु, अर्चनाच्या काकांचा त्यांच्या प्रेमाला विरोध होता. त्यांनी चंद्रकांत नाईक यांच्यासोबत अर्चनाचे काही वर्षांपूर्वी लग्न लावून दिले होते. या गोष्टीचा राग मनात धरून दत्ताराम नागू पिंगळा याने २८ मार्च २०१८ रोजी तुकाराम सजन्या नाईक यांच्या डोक्यावर आणि पाठीमागे धारदार हत्याराने मारहाण करून दुखापत करून त्यांना गंभीर जखमी केलं होतो.

तुकाराम सजन्या नाईक यांच्यावर अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असताना ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचं निधन झालं. त्यामुळे आरोपी दत्ताराम नागू पिंगळा याला सदर गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा झाली होती. दरम्यान, या गोष्टीचा राग दत्ताराम पिंगळा याच्या मनात होता. आरोपी दत्ताराम हा कारागृहातून पॅरोलवर बाहेर आला होता. अर्चनाला भेटण्यासाठी सोमवारी (दि.1) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आदिवासीवाडीमधील तिच्या घरी गेला. त्यावेळी दोघांचे शाब्दीक वाद झाले.

# दादरमध्ये नव्या 'बॉटलनेक'चे विघ्न, लोकमान्य टिळक पुलाचा रेल्वे रुळांवरील भाग अरुंद!

■मुंबई। प्रतिनिधी :

वाहतूककोंडीने हैराण झालेले मुंबईतील नागरिक आणि वाहनचालकांना आणखी एका बॉटलनेकला सामोरे जावे लागत आहे. दादर टीटी पूर्व ते प्लाझा सिनेमा पश्चिम परिसराला जोडणाऱ्या लोकमान्य टिळक पुलाच्या पूर्वेकडील रस्त्याचे रुंदीकरण झाले असले तरी रेल्वे रुळांवरील पुलाचा भाग मात्र जैसे थेच राहिल्याने रस्ता निमुळता होतो. त्यामुळे सकाळी-सायंकाळी गर्दीत वाहतूककोंडीचा प्रचंड फटका बसू लागला आहे. या त्रासातून पुढील एक ते दीड वर्षे तरी सुटका होण्याची चिन्हे दिसत नाही.



दादरहून उत्तरेकडे जाण्यासाठी असलेला सायनचा पूल आधीच पुनर्बांधणीसाठी बंद केले आहे, तर दक्षिणेकडील एल्फिन्स्टन पूलही बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे टिळक पुलावरच वाहनचालकांची पूर्ण भिस्त आहे. परिणामी या पुलावरील वाहतूक कोंडी रोजच्या दिनचयेर्चा भाग झाला आहे. एवढ्या कसरतीनंतरही जर कोंडीत अडकायचेच असेल तर वाहन सोसायटीतून वर्षभर बाहेरच न काढलेले बरे, नव्या पुलानंतर भविष्यात तरी दादरमधील रहिवाशांना दिलासा मिळो अशी गणपतीकडे प्रार्थना, अशी संतप्त प्रतिक्रिया रहिवासी जितेंद्र पडवळ यांनी दिली.

पुलाचे फायदे

- दादरमधील कोंडीतून मोठा दिलासा
- पूर्व-पश्चिम जोडणी अधिक सुलभ

टिळक पूल ट्विन केबल-स्टेड रोड ओव्हर ब्रिज

पहिला टप्पा-

जुन्या पुलाच्या शेजारी नव्या पुलाची बांधणी. वाहतुकीत कोणताही अडथळा न आणता काम सुरू. नवा पूल पूर्ण झाल्यावर वाहतूक तिकडे वळवणे.

दुसरा टप्पा

जुला पूल हटवून दुसऱ्या बाजूचा केबल स्टेड पूल पूर्ण करणे.

पहिला टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत मार्गी

पहिल्या टप्प्याचे काम ऑक्टोबर-डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे महारेलकडून सांगण्यात आले. त्यामुळे किमान पुढील दीड वर्षे मुंबईकरांना या नव्या ट्रॅफिक ट्रॅपची रोजची शिक्षा भोगावी लागणार आहे.

३७५ कोटी ट्विन केबल पूल

१. पुलाचे काम करणाऱ्या महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (महारेल) यांच्या म्हणण्यांनुसार सध्या केलेले रुंदीकरण हे पुढील टप्प्याच्या कामासाठीची तात्पुरती तरतूक आहे.

२. टिळक पुलालगतच ३७५ कोटी रुपयांचा ट्विन केबल पूल उभारला जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com